प्रेस नोट    दि.२८/०६/२०१९

---

## खडक पोस्टे तपास पथकाची कामगिरी

## सोनसाखळी चोरीच्या गुन्हयात सराईत गुन्हेगारास अटक

सदर बाबत अधिक माहिती अशी की, दिनांक २७/०४/२०१९ रोजी सकाळी ०६.०० वा. चे सुमारास फिर्यादी जेष्ठ महिली नामे श्रीमंती रंजना जयकुमार शहा, वय ६८ वर्षे, व्यवसाय- गृहिणी, रा. फ्लॅट नं. १५, दुसरा मजला, जोगेश्वरी हौसिंग सोसायटी (पिवळे जोगेश्वरी मंदीराचे वर), स.नं. ८८७, शुक्रवार पेठ, पुणे ०२ हया पंचमुखी मारुती मंदीर येथील मारुतीचे दर्शन घेवुन पायी चालत मुनिश्रुत भगवान जैन मंदिर रोडवर, नाईक वाड्याजवळ, शुक्रवार पेठ, पुणे येथे आल्या असतांना एका टुव्हीलर वरील इसमाने पत्ता विचारण्याचा बहाणा करुन त्यांचे गळयातील ५०,०००/- रु किं चे सोन्याचे मंगळसुत्र हे जबरदस्तीने हिसका मारुन त्यांना ढकलुन देवुन पळुन गेला होता, त्याप्रमाणे खडक पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं २०९/२०१९ भा.दं.वि कलम ३९२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील घटनास्थळाचे आजुबाजुस असलेल्या सी.सी.टी.व्ही फुटेज पाहिले असता, आरोपीने गुन्हा करतेवेळी वापरली दुचाकी गाडीचा नंबर व आरोपीचा चेहरा अस्पष्ठ दिसत असल्यामुळे खडक तपास पथक हे कसोशीने प्रयत्न करीत होते. खडक पोलीस स्टेशन कडील तपास पथकाचे पोलीस कर्मचारी पोकॉ ८९४८ आशिष चव्हाण व पोकॉ ८८२९ महावीर दावणे यांना त्यांचे बातमीदाराने बातमी दिली  की, सुमारे दोन महिन्यापुर्वी पंचमुखी मारुती मंदीर शुक्रवार पेठ पुणे येथे पायी चालत जाणाऱ्या वयस्कर महिलेच्या गळयातील सोन्याचे मंगळसुत्र हे खडक पोलीस स्टेशनचेकडील सध्या तडीपार आरोपी इरफान ऊर्फ डंगाज ख्वाजा शेख याने ओढली असुन तो सध्या काशेवाडी, १० नंबर कॉलनी समोर मोकळया पार्कीगमध्ये थांबले आहे, त्याप्रमाणे मा.श्री.भरत जाधव वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडक पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शनाखाली साधे वेशात सदर ठिकाणी सापळा रचला असता, खडक पोलीस स्टेशनकडील सध्या तडीपार आरोपी नामे इरफान ऊर्फ डंगाज ख्वाजा शेख वय २५ वर्षे रा.राजीव गांधी वसाहत, काशेवाडी पुणे यास स्टाफचे मदतीने अचानक झडप घालुन पकडले, त्याचेकडे दाखल गुन्योच संदर्भात तपास करता त्याने दाखल गुन्हा केलेल्याची कबुंली देवुन त्याचेकडुन दाखल गुन्हयातील जेष्ठ महिल्याच्या गळयातील जबरदस्तीने ओढलेले ५०,०००/- रु किं चे एक २ तोळयाचे वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र व गुन्हा करतेवेळी वापरलेले २५,०००/- रु किं ची एक हिरो होंन्डा स्प्लेंडर मोटर सायकल असा एकुण ७५,०००/- रु किं चा मुद्देमाल त्याचेकडुन जप्त करण्यात आलेला आहे. आरोपी इरफान ऊर्फ डंगाज ख्वाजा शेख यास मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ -१ पुणे यांनी २ वर्षाकरीता तडीपार केलेले असुन त्याचे विरुध्द खडक पोलीस स्टेशनला यापुर्वी घरफोडी, चोरी करणे, हत्यार वापरणे, तडीपार आदेशाचा भंग करणे, आत्महत्याचा प्रयत्न करणे अशा स्वरुपाचे एकुण २३ गुन्हे दाखल आहेत.

वर नमुद सर्व कारवाई ही श्री. श्रीकांत तरवडे, अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे, श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व श्री. प्रदिप आफळे ,सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन चे श्री.भरत जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उत्तम चक्रे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकाचे प्रभारी श्री.उमाजी राठोड, सहा पोलीस निरीक्षक व पोलीस कर्मचारी विठ्ठल पाटील, विनोद जाधव, गणेश सातपुते, संदिप पाटील, महावीर दावणे, आशिष चव्हाण, राकेश क्षिरसागर, समीर माळवदकर, बंटी कांबळे, प्रमोद नेवसे, रवी लोखंडे, इम्रान नदाफ, योगेश जाधव, विशाल जाधव, हिम्मत होळकर, यांचे पथकाने केली.